# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/11/2022 (मंगळवार) सकाळ

## चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा फेटरी ते वलनी रोड खंडाळा शिवारात येथे फिर्यादी नामे— सतपालसिंग जसविंदरपाल सिंग राजपाल, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट क्र.. ६७० गड्डी गोदाम कामठी रोड, नागपुर याने इंडीयन ऑईल पेट्रोलपंपला लागुन असलेल्या भिंतीला लागुन लोंखंडी ६५ तरापे ठेवले होते. त्यापैकी ४६ तरापे किंमती अंदाजे २३,०००/— रूपयाचा मुद्देमाल हा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पाली मो. नं. ९०११०३८६७७ पोलीस स्टेशन कळमेश्वर हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील उमरेड ते नागपुर रोड उदासा पुलीयाजवळ दिनांक २०/११/२०२२ चे १९.३० वा. सुमारास यातील मृतक महीला नामे— उषा गजेंद्रसिंह निकुम, वय ३० वर्ष, रा. उदासा, ता. उमरेड ही रोड क्रॉस करीत असतांना अज्ञात आरोपी कार चालकाने आपली कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मृतक महिला हिला गंभीर दुखापत करून हिचे मरणास आरोपी कारचालक कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस नाईक ब. नं. १८८७ अरविंद चव्हान, पोलीस स्टेशन उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अज्ञात आरोपी कार चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ), भादवी सहकलम १३४/१७७,१८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी हा घटनास्थळावरून पसार झाला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डोर्लीकर मो. क्र. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर